लोकमत

मस्ट READ

# सामाजिक सुरक्षा योजना जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**फोंडा :** वित्तीय समावेशनाच्या योजना देशभरात शंभर टक्के लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्र सरकारच्या वित्तीय सेवा विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या तीन महिन्यांच्या विशेष अभियानांतर्गत, राज्यस्तरीय बँकर्स समिती गोवा यांच्यावतीने नुकतेच फोंडा तालुक्यातील केरी (ग्रामपंचायत क्षेत्र) येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना यांसारख्या 'जनसुरक्षा' योजनांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविणे, तसेच केवायसी आणि पुन्हा केवायसी पडताळणी यावर भर देण्यात आला.




कार्यक्रमात आमदार गोविंद गावडे, अर्णबकुमार चौधुरी, प्रभाकर झा, कार्लोस रॉड्रिग्स, शैलेंद्र मिश्रा व इतर.

या कार्यक्रमाला प्रियोळ मतदारसंघाचे आमदार गोविंद गावडे उपस्थित होते. रिझर्व्ह बँकेचे कार्यकारी संचालक अर्णब कुमार चौधुरी यांनी आरबीआयकडून वित्तीय समावेशनाला चालना देण्याचे आणि वित्तीय साक्षरता वाढविण्याचे काम होत असल्याचे सांगितले.

एसबीआयचे सहायक महाव्यवस्थापक कार्लोस रॉड्रिग्स यांनी स्वागत केले, तर डीजीएम शैलेंद्र मिश्रा यांनी आभार मानले. नाबार्डचे महाव्यवस्थापक संदीप धारकर, आयओबीचे प्रादेशिक प्रमुख कुणाल सिंग, गोवा स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापकीय संचालक अनंत चोडणकर, तसेच आरबीआय व इतर बँकांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.